# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक २३/०३/२०२४ (शनिवार) दुपार**

---

### मोटरसायकल चोरी करणारे अट्टल गुन्हेगार नागपूर ग्रामीण पोलीसांच्या जाळयात

दिनांक २१/०३/२०२४ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पो.स्टे. मौदा परीसरात अप. क्र. २७२/२४ कलम ३७९ भा.द.वी. चे गुन्ह्यात आरोपी यांचे शोध घेत असता मुखबिरद्वारे खबर मिळाली की, सदर गुन्हयातील आरोपी हा मीनीमाता नगर नागपूर येथे राहणारा राहूल ठाकरे आहे. यावर राहुल ठाकरे यास त्याचे घरातुन ताब्यात घेऊन सदर गुन्हयाबाबत विश्वासात घेऊन सखोल विचारपूस केली असता त्याने मौदा, तसेच नागपूर शहर, वर्धा, जवाहर नगर, मोर्शी येथून मोटारसायकली चोरून त्याचे मुळगावी सातनेर जि. बैतुल (mp) येथे त्याचा लहान भाऊ **दिनेश सुखचंद खाकरे, वय ३७ वर्ष, रा. सातनेर त. आठनेर जि. बैतुल (mp)** याचे व त्याचा नातेवाईक **राधेश्याम दुर्गाचरण हीडोडे, वय १९ वर्ष, रा. सातनेर त. आठनेर जि. बैतुल (mp)** याचे मदतीने त्याचे मूळगावी व आजूबाजूच्या गावात विकल्याचे सांगितले. **राहुल सुखचंद ठाकरे, वय ४२ वर्ष, रा. मिनीमाता नगर नागपूर** यास घेऊन त्याचे मूळगावी सातनेर जि. बैतुल (mp) येथे जाऊन तेथून दिनेश व राधेश्याम यास ताब्यात घेऊन त्याचे कडुन मौदा येथून चोरी गेलेल्या व नागपूर शहर, जवाहर नगर, वर्धा, मोर्शी, येथून चोरी केलेल्या २१ वेगवेगळया कंपनीच्या मोटारसायकली एकूण किंमती १० लाख ३० हजार रुपये सर्व मोटारसायकली ताब्यात घेवून जप्त केल्या. गुन्हयातील सदर आरोपी यांची मेडीकल तपासणी करुन जप्ती मुद्देमालासह पुढील तपासा करीता पोलीस स्टेशन मौदा यांचे ताब्यात देण्यात आले.

**उघडकीस आलेले गुन्हे**

१) पो.स्टे. मौदा अप. क्र. १४/२४ कलम ३७९ भादंवी.

२) पो.स्टे. मौदा अप. क्र. २७२/२४ कलम ३७९ भादंवी.

तसेच पो.स्टे. वर्धा, पो.स्टे. जवाहर नगर, पो.स्टे. मोर्शी, पो. स्टे. कळमना, लकडगंज, MIDC गिट्टीखदान, नंदनवन, हिंगणा, बेलतरोडी, गणेशपेठ येथील १९ गुन्हे उघडकीस आणले.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधिक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार, अपर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, PSI बट्टूलाल पांडे, ASI नाना राऊत, HC विनोद काळे, ईकबाल शेख, प्रमोद भोयर NPC संजय बरोदीया, सायबरचे सतिश राठोड चालक HC मोनू शुक्ला यांनी पार पाडली.



---

## बॅटरी चोरी करणारे आरोपी नागपूर ग्रामीण पोलीसांच्या जाळयात

दिनांक २१/०३/२०२४ रोजी स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण येथील पथक रामटेक उपविभागात पो.स्टे. पारशिवनी हद्दीत पेट्रोलींग करीत असता गोपनीय खबर मिळाली कि, पालोरा शिवारात ३ इसम विना क्रमांकाच्या मोटरसायकलवर ट्रॅक्टरची स्टॉप लिंग पट्टी घेऊन जात आहे. या खबरे वरून त्यांना ताब्यात घेऊन विचारपूस करून नाव गाव विचारले असता सदर तिन्ही इसम हे विधिसंघर्ष ग्रस्त बालक असल्याचे समजले त्यांना सदर पट्टीबाबत विचारपूस केली असता उडवा उडवीचे उत्तर दिल्याने त्यांना विश्वासात घेऊन विचारपूस केली असता त्यांनी करंभाड शिवारातून बॅटरी, सोनेगाव तसेच टाऊन येथून ३ हायड्रॉलिक पट्ट्या, रॉड, स्टोपलिंग तसेच पीपला डाक बंगला शिवारातून १ बॅटरी चोरी करून विक्री केल्याचे सांगीतले. **आरोपी नामे– सत्यम सुरेंद्र ठाकूर वय ३४ वर्ष रा. खापरखेडा त. सावनेर (कबाडी दुकानदार)** यास चोरी केलेले लोखंडी ट्रॅक्टरच्या हायड्रोलींक पट्टया विक्री केल्याचे सांगितले. त्यांचे ताब्यातून १) ५ बॅटरी किंमती २५०००/– रू. २) ३ हायड्रॉलिक पट्ट्या, रॉड, स्टोपलिंग २८५००/–रू. ३) विना क्रमांकाची हिरो कंपनीची सी डी डॉन मोटरसायकल किंमती १७०००/– रू. असा एकूण ७०,५००/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

जप्त मुद्देमाल व आरोपी पुढील कायदेशीर प्रक्रिये करीता पोलीस ठाणे पारशिवनी यांचे ताब्यात देण्यात आले.

**उघडकीस आणलेले गुन्हे**

१) अप क्र. ३/२४ कलम ३७९ भादंवी २) अप. क्र. ८८/२४ कलम ३७९ भादंवी ३) अप. क्र. ९६/२४ कलम ३७९ भादंवी ४) पो. स्टे खापरखेडा अप. क्र. १७०/२४ कलम ३७९ भादंवि.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधिक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार, अपर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, सहायक पोलीस निरीक्षक किशोर शेलकी, पोलीस हवालदार रोशन काळे, नितेश पीपरोदे, उमेश फुलबेल, शंकर मडावी, पोलीस नायक वीरेंद्र नरड, विपीन गायधने चालक पोहवा अमोल कुथे स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांनी पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर